# भारतीय संविधानात आदिवांसीकरिता असलेल्या विविध तरतुदी

**डॉ.विद्या नामदेवराव खंडारे**
*समाजशास्त्र विभागप्रमुख*
*आदर्श महाविद्यालय, हिंगोली*

***सारांश-***
*जगाच्या पाठीवर असलेले सर्वच देश मानव विकास साधण्यासाठी कटीबध्द आहेत.मानवाला मानवा सारखे वागविले जावे ही अपेक्षा असते.हयासाठी कायद्याचा व संविधानाचा आधार घेवून व्यक्ती विकास व समाज हित साधले जाते. आदिवासी समाज म्हणजे अतिशय मागासलेला असे समिकरण आज पर्यंत असलेले दिसते परंतु, असे समिकरण,किंवा मत मांडणे चूकिचे होईल. आदिवासी समाज हा अतिप्राचीन मूळ भारतीय समाज आहे. भारतीय संविधानात आदिवासींचा समावेश अनुसूचित जमाती (Shedule Tribe) असा केला आहे. संविधानाच्या कलम 366 (25) नुसार,"अनुसूचित जमाती म्हणजे असे, समुदाय की जे घटनेच्या कलम 342 नुसार अनुसूचित जमाती म्हणून घोषित करता येतील." राज्यघटनेतील कलम 342 नुसार देशात 705 आदिवासी जमातींना अनुसूचित जमाती म्हणून अधिसूचित केले आहे. त्यापैकी ओरिसा राज्यात सर्वाधिक 62 आदिवासी जमाती आहेत.तर महाराष्ट्रात एकुण 47 आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. इ.स.2011 च्या जनगणेनुसार भारतात 10 कोटी 42 लाख 34 इतकी आदिवासींची लोकसंख्या असल्याची नोंद आहे. एकूण भारतीय लोकसंख्येशी तुलना केल्यास आदिवासींची लोकसंख्या 8.6 टक्के इतकी आहे.आदिवासींच्या रूढी,परंपरा संस्था, संस्कृती नष्ट केली जाऊ नयेत, त्यांच्यापैकी मुलभूत मानवी हक्क व,स्वातंत्र्य,सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था यांच्या आड न येणाऱ्या संस्था, परंपरा व सांस्कृतिक वैशिष्ठे यांची जपवणूक व संवर्धन करण्याची भूमिका अंगिकारणे या दृष्टीने आदिवासी लोकसंख्या असलेल्या घटकराज्यांनी सल्लागार मंडळाची नेमणूक करणे बंधनकारक केली आहे.*

***मुख्य शब्द –*** *आदिवासी, संविधान.*

**प्रस्तावणा-**
जगाच्या पाठीवर असलेले सर्वच देश मानव विकास साधण्यासाठी कटीबध्द आहेत. मानवाला मानवा सारखे वागविले जावे ही अपेक्षा असते. हयासाठी कायद्याचा व संविधानाचा आधार घ्यावा लागतो. म्हणून प्रत्येकाचे हितसंबंध जपण्यासाठी संविधानात्मक तरतुदी केलेल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या कल्याणासाठी, विकासासाठी, त्यांना सामाजिक न्याय मिळावा म्हणून सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक तसेच , शासकीय सेवांबाबतचे अधिकार, प्रशासकीय अधिकार आणि उपाययोजना याद्वारे व्यक्तींच्या विकासासाठी संविधानात तरतुदी करून विशेष काळजी घेतलेली आहे. आदिवासी व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना नोकरी-व्यवसायात आणि निवडणुकांत उमेदवार म्हणून त्यांच्यासाठी खास जागा ठेवल्या आहेत.भारतात 9 ऑगस्ट हा दरवर्षी आदिवासी दिवस म्हणून साजरा होतो. जागतिक स्तरावर ज्या-ज्या भू-भागावर मानवी वस्ती आहे त्या समाजव्यवस्थेचा आदिवासी अविभाज्य भाग आहे. परंतु प्रस्तुत शोध निबंधात भारतातील आदिवासी समाज व त्यांच्या करिता संविधानात असलेल्या विविध तरतुदी यांचा आढावा घेतला आहे.

**संशोधन पध्दती**- संशोधन विषयाच्या संबंधित तथ्य संकलनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग केला आहे.या मध्ये क्रमीक पुस्तके, मासिके, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट इत्यादी.

**उददेश-**
१. आदिवासी म्हणजे कोण हे जाणून घेणे.
२. आदिवासी समाजासाठी भारतीय संविधानातील तरतुदी जाणून घेणे.

इंग्रजीतील 'ॲबॉरिजिनीझ्' (Aborigines) या शब्दाचे मराठीतील भाषांतर म्हणजे आदिवासी आहे. त्यांना वनवासी म्हणावे, आदिवासी म्हणू नये, असाही एक दृष्टिकोन आहे. आदिवासींची वेगळी अस्मिता किंवा संस्कृती नसून ते इतर नागरिकांप्रमाणेच आहेत, ते वनात वस्ती करून राहतात, एवढाच त्यांचा वेगळेपणा आहे. 'प्रिमिटिव्ह (primitive) म्हणजे आदिम किंवा अप्रगत लोक आणि 'सॅव्हेज'(savage) म्हणजे मागासलेले किंवा रानटी लोक. 'प्रिमिटिव्ह' किंवा 'सॅव्हेज' या शब्दांतून आदिवासींचा मागासलेपणा, व भोळेपणाही दिसून येतो. आदिवासी शब्दास निःसंदिग्ध अर्थ प्राप्त करून देणे, हे समाजशास्त्रातील आजही न सुटलेले कोडे आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना स्थानिक, मुळचा (Indigenous) म्हणावे अशी शिफारस केली आहे, कारण आदिवासी सांस्कृतिक घडण, इतर संस्कृतींच्या संपर्का शिवाय स्वतंत्र रीतीने झाली आहे. अलीकडे त्यांना निरक्षर (Nonliterate) समाज म्हणून संबोधले जावे अशी विचारधारा रूढ होत आहे. आदिवासी समाज म्हणजे अतिशय मागासलेला असे समिकरण आज पर्यंत असलेले दिसते

परंतु, असे समिकरण,किंवा मत मांडणे चूकिचे होईल. आदिवासी समाज हा अतिप्राचीन मूळ भारतीय समाज आहे. एकेकाळी भारतीय वनसंपत्तीचा मालक असणारा हा समाज आहे. आदिवासी म्हणजे आदिकाळापासुन वास्तव्य असणारा समुह होय. आदिवासी समाज हा निसर्गपूजक आहे. त्यांची भाषा, रूढी,परंपरा, चालीरिती अन्य ग्रामीण आणि शहरी लोकांपेक्षा भिन्न असतात.

इ.स. 1962 साली शिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने, आदिवासीची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे- "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षरओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित, सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिक पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला,आदिवासी समाज म्हणतात. डि. एन. मुजूमदार यांच्या मते," समान नाव असणारा, एकाच भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशिर व्यवस्था स्विकारणाऱ्या कुटूंबांचे किंवा कुटूंब समुहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय." डॉ. गो. स. घुर्ये यांच्या मते," तथाकथित रहिवासी किंवा मागासलेला हिंदु म्हणजे आदिवासी होय." भारतीय संविधानात आदिवासींचा समावेश अनुसूचित जमाती (Shedule Tribe) असा केला आहे. परंतु आदिवासी किंवा अनुसूचित जमातीची वैशिष्ट्ये सांगता येतील, अशी व्याख्या कुठेही केलेली नाही. संविधानाच्या कलम 366 (25) नुसार," अनुसूचित जमाती म्हणजे असे, समुदाय की जे घटनेच्या कलम 342 नुसार अनुसूचित जमाती म्हणून घोषित करता येतील." राज्यघटनेतील कलम 342 नुसार देशात 705 आदिवासी जमातींना अनुसूचित जमाती म्हणून अधिसूचित केले आहे. त्यापैकी ओरिसा राज्यात सर्वाधिक 62 आदिवासी जमाती आहेत.तर महाराष्ट्रात एकुण 47 आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. आदिवासी समाजांसंबंधी भरपूर संशोधन व लिखाण झाले असले, तरी आदिवासी या संज्ञेची सर्वमान्य व्याख्या आहे,असे म्हणता येत नाही. इ.स.2011 च्या जनगणेनुसार भारतात 10 कोटी 42 लाख 34 इतकी आदिवासींची लोकसंख्या असल्याची नोंद आहे. एकूण भारतीय लोकसंख्येशी तुलना केल्यास आदिवासींची लोकसंख्या 8.6 टक्के इतकी आहे. अनुसूचित जामातींना आदिवासी, मूलनिवासी, आदिम जाती व टोळ्या, वन्यजाती व गिरिजन अशी वेगवेगळी नावे आहेत. त्यांपैकी 'आदिवासी' (अपुसूचित जमाती)हे नाव राष्ट्रीय परिभाषेत अधिक प्रचलित आहे.

**आदिवासींची वैशिष्ट्ये-**

आदिवासी जमातींची काही ठळक वैशिष्ट्ये अशी :

१. आदिवासी समाज एका विशिष्ट भूप्रदेशात रहातो व तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजाच्या भूप्रदेशाच्या मानाने लहान असतो. आदिवासी क्षेत्र इतर प्रगत समाजापासून दूर जंगलात डोंगर दऱ्यात असते. म्हणजे आधुनिकेते पासून दूर राहणारा हा समाज आहे.
२. आदिवासी समाज शैक्षणिक व आर्थिक दृष्टया मागासलेला आहे.
३. प्रत्येक आदिवासी समाजाची स्वतंत्र पंचायत असते. आदिवासी समाजाचे नियंत्रण पूर्णपणे पंचायत किंवा त्यांचा मुख्य नेता करत असतो.
४. वेगवेगळया आदिवासी समाजाची साधारणपणे स्वतंत्र भाषा किंवा बोली असते.दैनंदिन व्यवहारात याच बोली भोषेचा चापर केला जातो.
५. आदिवासी समाजाची साधी अर्थव्यवस्था हे महत्तवपूर्ण वैशिष्टये आहे.त्यांच्या निर्वाह प्रधान अर्थव्यवस्थेचे उदिष्ट केवळ दैनंदिन गरजापूर्ती असते.
६. आदिवासी समाजात परंपरेला प्राधान्य असते. परंपरेचा ठेवा एक पिढी दुसऱ्या पिढीस कथा, काव्य, नृत्य इत्यादी च्या माध्यमांद्वारे देतात.परंतु लिखित स्वरूपात साहित्याचा आभाव आहे.
७. आदिवासी समाजात निसर्गपूजेस महत्त्व असते.
८. आदिवासी समाजात परंपरा व सामाजिक नियंत्रण यांवर भर असल्याने सर्व लोकांच्या वागण्यात सारखेपणा असतो. दैनंदिन व्यवहारातील ठराविक सामाजिक वर्तणामुळे चालीरिती बनतात. साधारणपणे या समाजात एकसारखेपणा जास्त असलेला दिसतो.

विशिष्ट भूप्रदेश, समान बोलीभाषा पण लिपी नाही, निसर्गावर अवलंबून असलेली अशी वेगळी जीवनपद्धती, साधी अर्थव्यवस्था, सामाजिक एकजिनसीपणा इत्यादी वैशिष्ट्ये या समाजाची असलेली दिसतात.

**भारतीय संविधानातील तरतुदी :**

भारतीय घटनाकारांनी समस्त भारतीय जनतेच्या परिस्थितीची जाणीव ठेऊन 'भारतीय संविधान' निर्माण केले आहे. 26 जानेवारी 1950 पासून संविधानाची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधान हे जगातील एक अद्वितीय ठरले आहे. याचे कारण यासाठी घटनाकारांनी घेतलेली अभूतपूर्व मेहनत होय. भारतामध्ये सामाजिक, आर्थिक दृष्टीने न्याय व समता निर्माण होण्याच्या उद्देशाने मागासलेल्या जाती, जमाती, अल्पसंख्याक यांच्या विकासासाठी संविधाना मध्ये तरतूदी केलेल्या आहेत. आदिवासी समाजाचा मागासलेपणा लक्षात घेऊन त्यांचे

हितसंबंध जपण्यासाठी, त्यांना पुरेसे संरक्षण देण्यासाठी, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी,त्यांच्या विकासासाठी, भारतीय संविधाना मध्ये अनेक तरतूदी केलेल्या आहेत.

1. संविधानाचे कलम 14 नुसार धर्म, वंश, जात, लिंगभेद व जन्म ठिकाण यावरून त्यांच्या विरुद्ध पक्षपात केला जाऊ नये _ अथवा त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जाऊ नये यासाठी प्रतिबंधक अशी कायदेशीर _तरतूद करण्यात आली आहे. जर पक्षपात ,भेदभाव झाला तर असे वर्तन दंडनीय गुन्हा ठरवला जातो.म्हणजेच कायद्याचे समान संरक्षण नाकारले जाणार नाही.

2. संविधानाचे कलम 19(5)नुसार, अनुसूचित जातीच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर,अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार म्हणजे आपली उपजिविका करण्यासाठी कोणताही व्यापार,व्यवसाय करून आपला आर्थिक विकास साधता येईल.

3. संविधानातील, कलम 23 आणि 24 नुसार सक्तीची वेठबिगारी नाहिशी केली आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाला शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याचा हक्क देण्यात आला आहे. व्यक्तीच्या इच्छेविरूध्द काम करून घेण्यास प्रतिबंध केली आहे.तसेच धोक्याच्या ठिकाणी काम करण्यावर प्रतिबंध केला आहे.

4. भारतीय संविधानातील 46 व्या कलमानुसार समाजातील दुर्बल गटांचे विशेषतः अनुसूचित जाति जमातींचे, शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांचे रक्षण राज्य शासन विशेष काळजीने करील आणि सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून त्यांचे संरक्षण करील, असे आश्वासन देण्यात आले आहे.

5. संविधानातील चौथ्या भागातील 164 व्या कलमानुसार आदिवासींची अधिक वस्ती आलेल्या राज्यात आदिवासींच्या कल्याणसाठी व विकासासाठी एक स्वतंत्र आदिवासी मंत्री नियुकत करण्याची तरतुद केलेली आहे. बिहार, मध्यप्रदेश आणि ओरिसा घटकराज्यांत आदिवासी आणि अनुसूचित जाती मागासलेल्या वर्गांच्या कल्याणासाठी एक स्वतंत्र मंत्रालय निर्माण करण्यात आले आहे.

6. संविधानातील कलम 244 नुसार परिशिष्ट 5 (क) यास अनुसरून आसाम वगळून इतर भारतात आणि परिशिष्ट 6 परिच्छेद 20 यास अनुसरून आसाम मध्ये असलेला बहुसंख्य आदिवासी प्रदेश हा अनुक्रमे अनुसूचित आणि आदिवासी क्षेत्र म्हणून घोषित करण्याची तरतूद आहे.

7. अनुसूचित प्रदेशातील शासनाची पातळी राज्यांतील इतर प्रदेशांच्या पातळी इतकी उंचवण्यासाठी, केंद्राकडून राज्य सरकारांना वेळोवेळी अनुदान मिळण्याची व्यवस्था संविधानातील कलम 275 व्या कलमात करण्यात आली आहे.

8. संविधानाच्या कलम 330, 332 आणि 334 यानुसार लोकसभेत आणि राज्य विधिमंडळांतून आदिवासींना काही काळापर्यंत राखीव प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

9. संविधानाच्या कलम 335 नुसार, केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या खात्यांतून नोकऱ्या व जागांसंबंधी नेमणुका करताना शासकीय कार्यक्षमता लक्षात घेऊन अनुसूचित जाती-जमातींचे हक्क विचारात घेतले जातील.यास अनुसरून आदिवासींकरिता पाच टक्के जागा राखून ठेवण्यात आलेल्या आहेत. तथापि आदिवासींची पुरेशी प्रगती झाल्यावर आणि इतर समाजांच्या बरोबरीने त्यांचा आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक स्तर उंचावल्यावर या सवलती काढून घेण्यात याव्यात. आधी अशी तरतुद संविधान अंमलात आल्यानंतर दहा वर्षांपर्यंतच ठरविली होती. परंतु ती आता सातत्याने दहा- दहा वर्षांनी वाढविली जात आहे.

10. संविधानातील कलम 338 (क) नुसार अनुसूचित जाती व जमातींसाठी एका खास अधिकाऱ्याच्या नेमणुकीचीही तरतूद करण्यात आली आहे. एकोणव्वदावी घटनादुरूस्ती अधिनियम 2003 नुसार ही बाब समाविष्ठ करण्यात आली आहे.यानुसार अनुसूचित जाती करिता,अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोग स्थापन केला जातो. या आयोगाची स्थापना 1978 मध्ये करण्यात आली.

11. राज्यांतील अनुसूचित जमातींच्या आणि मागासलेल्या वर्गांच्या कल्याणासाठी आवश्यक असलेल्या योजना आखून त्या कार्यवाहीत आणण्यासाठी राज्य सरकारांना योग्य त्या सूचना करण्याचा (उदा. जमिनीची पाहणी करणे, त्याबद्दलचे अहवाल मागविणे, आदिवासी सल्लागार समिती स्थापन करणे इ.) शासकीय अधिकार केंद्र सरकारने संविधानातील कलम 339 नुसार आपल्याकडे घेतला आहे.

12. संविधानाचे कलम 340 नुसार मागासवर्गाच्या स्थितीचे अन्वेषण करण्यासाठी आयोगाची नियुक्ती, भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या स्थितीचे व त्यांना ज्या अडचणी सोसाव्या लागतात त्यांचे अन्वेषण करणे आणि अशा अडचणी दूर करण्यासाठी व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी, संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणत्या उपाययोजना कराव्या, यासंबंधी आणि त्या प्रयोजनाकरीता संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणती अनुदाने द्यावीत व कोणत्या शर्तींना अधीन राहून अशी अनुदाने द्यावीत, यासंबंधी शिफारशी करणे या करीता राष्ट्रपतींना, त्यांना योग्य वाटतील अशा व्यक्तींचा मिळून बनलेला आयोग, आदेशाद्वारे नियुक्त करता येईल, आणि असा

आयोग नियुक्त करणाऱ्या आदेशाद्वारे, आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल.

13. संविधानाचे कलम 366(25) नुसार अनुसूचित जमाती म्हणजे अशा जमाती किंवा आदिवासी समुदाय किंवा अशा जमाती किंवा आदिवासी समुदायामधील भाग किंवा गट जे या संविधानाच्या उद्देशांसाठी अनुच्छेद 342 अन्वये अनुसूचित जमाती मानले जातात.

14. आदिवासींची प्रगती व्हावी यासाठी शासकिय व निमशासकिय खाती, महामंडळे इत्यादी ठिकाणी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव कोटा पद्धतीने भरती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, प्रादेशिक लोकसेवा आयोग व निवड मंडळामार्फत भरल्या जाणाऱ्या जागांपैकी अनुसूचित जमातीसाठी साडेसात टक्क्यांपर्यंत जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी लोकसंख्येनुसार जास्त जागा राखीव आहेत. तसेच वय, शैक्षणिक पात्रता व इतर अटींमध्ये काही सवलती देण्याची तरतूद आहेत. याशिवाय शैक्षणिक संस्थामधील विविध अभ्यासक्रमासाठी, लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव कोटा पद्धतीने प्रवेश, विनाशुल्क वा अल्प शुल्क घेऊन वसतिगृहाची सुविधा, शिष्यवृत्ती,अर्थसाहाय्य या स्वरूपातील मदतीचा हात दिला जातो.

15. जंगल व वनविषयक त्यांचे हक्क सुरक्षित व संरक्षित रहावेत या दृष्टीने आवश्यक ते कायदे करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारवर टाकली आहे. जमिन हा विषय राज्य सरकारच्या अधिकार क्षेत्रात येत असल्यामुळे आदिवासींच्या जमिनी हस्तांतरास प्रतिबंध करणारे तसेच त्यांच्या हातून गेलेल्या जमिनी परत मिळाव्यात यासाठी योग्य त्या तरतुदी सरकारने केलेल्याआहेत.

16. आदिवासींच्या रूढी,परंपरा संस्था, संस्कृती नष्ट केली जाऊ नयेत, त्यांच्यापैकी मुलभूत मानवी हक्क व स्वातंत्र्य, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था यांच्या आड न येणाऱ्या संस्था , परंपरा व सांस्कृतिक वैशिष्ठे यांची जपवणूक व संवर्धन करण्याची भूमिका अंगिकारणे या दृष्टीने आदिवासी लोकसंख्या असलेल्या घटकराज्यांनी सल्लागार मंडळाची नेमणूक करणे बंधनकारक केली आहे.

17. आदिवासी करीता दोन महत्वाचे कायदे झाले आहेत. एक म्हणजे पेसा (PESA: Panchayat Extension to Scheduled Areas), यालाच आदिवासी स्वयंशासन कायदा म्हणतात आणि दुसरा म्हणजे जंगल अधिकार कायदा (Forest Rights Act). या कायद्यांमुळे आदिवासी समाजाला काही विशेष अधिकार बहाल करण्यात आले आहेत.

वरील विविध तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. आदिवासींना घटनात्मक संरक्षण देण्यासाठी भारतीय संविधानाला,अनुसूची जोडण्यात आलेली आहे. या अनुसूचि मध्ये समाविष्ठ केलेल्या जमातींसाठी संविधानात राष्ट्रीय आयोग, आरक्षण, अनुसूचित जाती- जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, आदिवासी स्वशासन कायदा, जंगल अधिकार कायदा, पेसा कायदा इत्यादीविषयी तरतूदी केलेल्या आहेत. प्रत्यक्षात हे कायदे किती राबवले जातात आणि आदिवासींना त्याचा किती फायदा होतो, हा एक प्रश्नच आहे. भारताच्या घटनासमितीने तयार केलेला मसुदा हा सर्वासाठी पवित्र दस्तऐवज आहे. मसूदा समितीने मंजूर केलेला घटनेचा मसूदा देशाला सादर करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "या घटनेची अंमलबजावणी करणारे नेतृत्तव व नोकरशाही कशा भावनेने ही घटना अंमलात आणतात आणि आपल्या समोरील महाकाय समस्येबाबत काय भूमिका स्विकारतात, यावर या घटनेतील संकल्पनांना मुर्त स्वरूप देणे अवलंबून राहणार आहे." संविधानात आदिवासी समाजा करिता विविध तरतुदी केलेल्या आहेत,खास संरक्षण दिलेले आहे.तरिही हा समाज आज ही मुख्यप्रवाहात येण्यासाठी धडपडत असतांना दिसतो. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काही उपाययोजना कराव्या लागतील.

1) संविधानाने आदिवासी समाजाकरिता जे काही राजकिय, सामाजिक, आर्थिक न्यायासाठी ज्या तरतुदी केलेल्या आहेत, याचा फायदा खरचं या समाजाला झाला आहे का याचा आढावा घेणे आज काळाची गरज झाली आहे.

2) सध्या आदिवासी समाजाकरिता त्यांच्या बोली भाषेतून शिक्षण देण्याची व्यवस्था नाही,त्यामुळे शिक्षणांतील त्यांचा टक्का कमी आहे,त्यामुळे त्यांच्या करिता बोलीभाषेतून शिक्षण देण्याची व्यवस्था करावी लागेल.बोली भाषे बरोबरच इतर ही भाषेंचे शिक्षण दिले जावे.

3) महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतलाआहे. 26 जानेवारी 2020 पासून प्रत्येक सरकारी शाळांमध्ये संविधानाच्या,उद्देश पत्रिकेचे वाचण बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे शालेय वयापासून विद्यार्थ्यांना संविधानातील मुल्यांची माहिती होईल.ही माहिती आदिवासी करिता बोलीभोषेतून दिली जावी.

4) आदिवासी तरूणांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रेरणा द्यावी लागेल, त्यानां उच्च शिक्षणांसाठी, विदेशात शिक्षण घेण्यासाठी, शिष्यवृत्ती दिली जावी.

5) आदिवासी युवक-युवतींना वैद्यकिय,अभियांत्रिकी किंवा तत्सम प्रवेश प्रक्रिया यांचे मोफत मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळण्याची व्यवस्था करावी लागेल.

6) शासकिय सेवेतील, प्रशासकिय सेवेतील यशाचा टक्का वाढविण्यासाठी, प्रशासना मध्ये सक्रिय सहभाग असावा या करिताआदिवासी समाजातील पदवीधर युवकांना देशातील

नामांकित संस्थांमध्ये प्रशिक्षण दिले पाहिजे.यासोबतच त्यांच्या निवासाची व जेवणांची व्यवस्था केली पाहिजे.

7) आदिवासी समाजाला आर्थिक दृष्टया सबळ करण्यासाठी, त्यांचे स्थंलातर रोखण्यासाठी,शेती व वन यांच्याशी निगडित उद्योग व्यवसाय करण्यासाठी आदिवासींना प्रोत्साहित करावे लागेल. तशा प्रकारचे प्रशिक्षण त्यांना देण्याची व्यवस्था करावी लागेल.

8) शासनाने आदिवासी विकासांकरिता ज्या विविध योजना सुरू केलेल्या आहेत,त्यांचा लाभ मूळ आदिवासी समाजा करीताच झाला पाहिजे.

9) संविधानातील 73 व्या व 74 व्या घटनादुरूस्ती नुसार आदिवासींना लोकसंकख्येच्या प्रमाणात पदाधिकारी व प्रतिनिधित्वासाठी राखीव जागांची तरतुद करण्यात आली आहे. या तरतुदींमुळे स्थानिक स्वराज्य संस्थातून,आदिवासीं करिता प्रतिनिधित्व मिळत असले तरिही निर्णय प्रक्रियेत त्याचा सहभाग वाढला पाहिजे.यासाठी त्यांना वारंवार प्रशिक्षण देवनू त्यांन मिळालेले अधिकार कसे वापरावेत,हे शिकविले पाहिजे.

10) आदिवासी विकास व संरक्षणांसाठी करण्यात आलेल्या कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी शासकिय व प्रशासकिय पातळीवरून प्रामाणिकपणे होणे गरजेचे आहे.

11) आदिवासी समाजाची संस्कृती,वारसा,व परंपरा यांचे जतन करावे लागेल व त्यांच्याकडे असलेले ज्ञान व कौशल्य याविषयीची माहिती सामान्या लोकांपर्यंत पोहचवावी लागेल. अशा प्रकारे प्रस्तुत शोध निबंधातून आदिवासी समाजाकरिता भारतीय संविधाना मध्ये असलेल्या विविध तरतुदी जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. *आपटे प्रभा वअन्य, वनवासी विकास संकल्पना आणि दिशा, आस्वाद प्रकाशन, मुंबई,2003.*

२. *संगवे विलास –आदिवासींचे सामाजिक जीवन,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 1999.*

३. *चपळगावकर नरेंद्र-भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 1994*

४. *दत्ता सांगोलकर, मानवी हक्क, जिज्ञासा प्रकाशन 2013.*

५. *डॉ. वा. ना. कुबेर, डॉ. आंबेडकर-विचार मंथन, लोकवाङमय गृह लि.मुंबई,1982*

६. *संकलन, डॉ. अनंत कळसे,प्र धान सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय घटना समिती समोर केलेली भाषणे-महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, डिसेंबर 2015.*

७. *https://mr.vikaspedia.in/social-welfare/907-92a94193894d924915947*